महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर–440 001
Email : msboardnagpur@gmail.com

महत्वाचे
कालमर्यादित

पत्र क्र.: नाविमं / मागो / प्रात्य / 948
नागपूर, दिनांक. 19 / 03 / 2024

**प्रति,**
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व क. महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय** :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) फेब्रु / मार्च 2024 Out of Turn परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत..

**संदर्भ** :– 1. पत्र क.रा.मं. / परीक्षा–2 / 5508 / दिनांक –26 / 12 / 2023
2. रा.मं.पत्र क्र. गणकयंत्र 01 / 178– दिनांक 15 / 01 / 2024
3. नाविमं / उ.मा.प्रात्य / 208 – दिनांक 23 / 01 / 2024
4. पत्र क.रा.मं. / परीक्षा–2 / 1170–दिनांक.15 / 03 / 2024

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपंत्र (इ.12वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) फेब्रु / मार्च 2024 अंतर्गत दि. 20 / 03 / 2024 ते 22 / 03 / 2024 या कालावधीमध्ये इ.12वी व दि. 27 / 03 / 2024 ते 30 / 03 / 2024 या कालावधीमध्ये इ.10वी च्या Out of Turn परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

फेब्रु / मार्च – 2024 च्या परीक्षांपासून Out of Turn ने घेण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षांचे आयोजन शाळा / कनिष्ठ महाविद्यालयानांच करावयाचे आहे. त्याकरिता लागणारे शुल्क इ.10वी साठी प्रती विद्यार्थी विज्ञान विषयाकरिता रू. 75 / – व इ.12वी करिता प्रति विषय रू. 100 / – DD/ रोखीने मंडळात जमा करावे.

सदर विद्यार्थ्याचे गुण नोंदविण्याकरीता मंडळाचे संकेतस्थळ www.mahahsscboard.in वरील "INTERNAL / PRACTICAL MARKS & GRADES" (HSC) (SSC) ही लिंक वरील Out of Turn परीक्षा कालावधीमध्ये सुरू राहील. त्याव्दारे सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळा यांनी Out of Turn परीक्षा देण्याऱ्या विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने नोंदवावयाचे आहेत. तसेच त्यामध्ये ABSENT दर्शविलेल्या विद्यार्थ्यांची खातरजमा करावी. त्यानंतर अंतिम गुणतक्ते व भरलेल्या शुल्काच्या पावत्या इयत्ता 12वी दि. 27 / 03 / 2024 पर्यंत व इयत्ता 10वी दि. 03 / 04 / 2024 पर्यंत नागपूर विभागीय मंडळ कार्यालयात जमा करावयाचे आहेत. या बाबत सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंद घेण्यात यावी.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर